!! श्री !!

**खासदार चंद्रकांत खैरे**

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३२०/२२/०५/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# मी नथुराम गोडसे बोलतोय नाटकास नाट्य रसिकांनी दिला उत्स्फुर्त प्रतिसाद

## शिवसेना वर्धापन दिनानिमित्त शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन

**संभाजीनगर ( ता.०६ )** शिवसेना संभाजीनगर शाखेच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त हिंदू जनजागरण सप्ताहा दरम्यान मी नथुराम गोडसे बोलतोय नाटकास नाट्य रसिकांनी टाळया आवाजाने प्रतिसाद दिला. संत तुकाराम नाट्यगृह एन-५ सिडको येथे झालेल्या नाटकास हाऊसफुल्ल गर्दी करत शेवटच्या संवादापर्यंत नाट्यगृह सोडले नाही. सुरुवातीला दिपप्रज्वलन करतांनी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, महापौर त्र्यंबक तुपे, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, बंडू ओक, सभागृह नेता राजेंद्र जंजाळ, जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे, राजु वैद्य, माजी महापौर कला ओझा, सुनिता देव, रंजना कुलकर्णी, प्रतिभा जगताप यांची उपस्थिती होती.

प्रदीप दळवी लिखित, विनय आपटे दिग्दर्शित, शरद पोंक्षे यांच्या प्रमुख भुमिकेत नाट्याला विशेष महत्व प्राप्त होते. महात्मा गांधी यांची हत्या व नथुराम गोडसे यांच्या मनातील भावना यांचा संगम प्रेषकांना अधिक भावला. आतापर्यंत फक्त इतिहासामध्ये ऐकलेल्या नथुराम गोडसे प्रत्यक्षात बघायला मिळणार असल्याने गांधीवादी व प्रतिवादी दोन्ही विचारांच्या प्रेषकांनी शांत, संयमी, भुमिका घेत नाटकाचा आस्वाद घेतला.

नाट्यांच्या मध्यतंरी कलाकार जयंत घाटे (शेख सुपरीडेंट), शरद पोंक्षे (नथुराम गोडसे) हेमंत डोणकर, अतुल अभ्यंकर, अमित जायेकर, समर्थ म्हात्रे, प्रदिप मुळे, अशोक पत्की या सर्व प्रमुख कलाकरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर १९८५ पासुनची शिवसेना ३१ वर्षाची शिवसेना संपूर्ण इतिहास शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी मांडला. यापुढेही एम. आय. एम. सारख्या जातीयवादी संघटनांना प्रतिकार करण्यासाठी हिंदू धर्मीयांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. कार्यक्रमांच्या यशविस्तेसाठी पंढरीनाथ गोंडे पाटील, राजु परदेशी, स्थानीक नगरसेवक मकरंद कुलकर्णी, शिवा लुंगारे, विरभद्र गादगे, बद्रिनाथ ठोंबरे, सचिन गोखले, सचिन खैरे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी कमलाकर जगताप, मनोज गांगवे, रावसाहेब आम्ले, सुनिता हाळनोर, रोजतेकर, उपशहरप्रमुख संदेश कवडे, जयसिंग होलिये, गणेश तेलोरे, विजय सुर्यवंशी, राजश्री पोफळे, संगीता राऊत, दुर्गा भाटी, राजश्री राणा, शुभांगी लातुरकर, अंजली मांडवलकर, रुपाली जोशी, मंजुषा नागरे, लक्ष्मी नरहिरे, अरुणा भाटी आदिंसह नाट्यप्रेमीची व शिवसैनिकांची, युवासैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400